# "घर"

घरंदाज ह्या शब्दातून घराची वागणूक समजते. नितीमान, सुसंस्कृत घरांतली मंडळी घरंदाज म्हणून ओळखली जातात. योग्य परंपरा येते. त्या घरची माणसं सरळ, मदत करणारी, सौजन्याने वागणारी असतात. संवेदनशील असतात. "शेअर" करण्याचा, म्हणजे समोरच्याला आजमावण्याचा प्रत्येकाचा "नजरिया" असतो. तरीही घरं प्रेमानं नांदतात. एकमेकांना सावरून पुढे जातात. घर आणि घराभोवती आपण सतत रुंजी घालत असतो.

नवीन ओळख झाली कि आपण त्या व्यक्तीला म्हणतो, "या ना एकदा आमच्या घरी." यातून त्या व्यक्ती विषयी वाटणारी "जवळिक" सूचवून मी पणाच्या धर्माशी कुरवाळला जातो. माणूस स्वभावत:च इतरांसारखं जगणारा, इतरांच्यात रमणारा - तिथेही धागे जुळावे लागतात. ज्यात "घर" महत्वाची भूमीका बजावते, निभावते. पूर्वी सगळे एकत्र रहात. केक, पुस्तक "शेअर" करतात, पण "घर" काय शेअर करायचं! घरातर तुझं, माझं आपल्या सगळ्यांच असतं. आपलेपणाच्या कक्षा रुंदावतात. मनोमनात कोणाजवळ बोलायला वाव असतो. आस्थेनं विचारणं - ममत्वानं ऐकणं परस्परपूरक गोष्टी घडत होत्या.

आता कुटुंब विभक्त झाली. घरं संकुचित झाली. मनं आकुंचन पावली. विचारांना दिशा न मिळाल्याने भावनांचा उद्रेक भलतीकडे व्हायला लागला. पैशाची आवक, घराचं देखभाल हे विषय साधे सोपे राहिले नाहीत.

पहिल्यापासून घर बांधण्याचं शास्त्र आहे. अलीकडे वास्तुशास्त्राचं महत्व वाढत आहे. त्यात तथ्य किती - जाहिरात वाढवण्याचं कसब किती हा विषय वेगळा. आपल्याकडे वास्तुदेवता - तिची पूजा करणं हि मान्य रीत आहे. घरातील "सजीवता" त्यातून अभिप्रेत होते. घराचं चैतन्यपूर्ण अस्तित्व ध्यानात येतं.

घरातल्यांनी एकमेकांविषयी आदर, प्रेम, आपुलकी जपली तर घराला घरपण नक्की येतं.

श्रीमती ज्योती बाळकृष्ण काळे
प्रितमनगर २/४,
राहुल नगर जवळ, कोथरूड
पुणे ४११ 038

